# महाराष्ट्र शासन

## आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई

जुने जकात घर, 2 रा मजला, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई 23

Email id-: aoexcisecom@gmail.com

वाचा-: 1. शासन वित्त विभाग परिपत्रक क्र. संकीर्ण 1009/प्र. क्र. 32/कोषा. प्र. 5, दि.16.12.2011.

2. शासन शुध्दीपत्रक्र. क्र. सकीर्ण 1009/प्र. क्र. 32/भाग-1/कोषा प्र. 5, दि. 27.09.2012.

3. या कार्यालयाचे समक्रमांकाचे परिपत्रक दि. 10.05.2013.

4. संचालक, संचालनालय लेखा व कोषागारे यांचे पत्र क्र. व्ह. ट्रे./न. क्र. 122अ/2016/72, दि. 01.03.2016.

## परिपत्रक

विषय-: ग्रासप्रणालीद्वारे शासन महसुली जमा रक्कम भरणा करण्याबाबत....

क्र. क्रमांक-: लेखा 112013/ग्रासप्रणाली/ई-चलन/13 ड मुंबई 7 जून, 2016.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्य शासनाने वित्त विभागाच्या नियंत्रणाखाली व्हर्च्युअल ट्रेझरीची स्थापना केली असून सहभागी बँकांच्या पेमेंट गेट-वे चा वापर करुन इलेक्ट्रॉनिक माध्यमातून शासकीय जमा लेखांकन प्रणालीद्वारे (GRAS) शासनाच्या विविध विभागांशी संबंधित जमा रकमांचा भरणा करण्याची सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानुसार आपल्या विभागाचा जमा महसूल हा शासकीय जमा लेखांकन प्रणालीद्वारे (GRAS) जमा होतो हे आपणांस विदित आहेच. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या विविध लेखाशीर्षाखाली जसे अनुज्ञप्ती मंजूरी/ नुतनीकरण, विशेषाधिकार शुल्क, आयात/ निर्यात शुल्क, अबकारी कर इ. मार्गांनी महसूल शासन जमा होत असतो. संबंधित महसूल हा शासकीय कोषागार, मुंबई येथे तसेच शासनाचे "ग्रास" या प्रणालीद्वारे रिझर्व बँक ऑफ इंडियामध्ये ई-चलनाद्वारे शासन जमा होतो. आजमितीस विभागाचा 97 टक्के महसूल हा ग्रासप्रणालीद्वारे शासन जमा होत असून सदरचे प्रमाण 100% वर नेण्यासाठी सर्व संबंधितांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

तरी उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता "ग्रास" या प्रणालीद्वारे भरणा करावयाच्या महसूलाबाबत खालीलप्रमाणे सूचना निर्गमित करण्यात येत आहेत-:

1. सर्व अनुज्ञप्तीधारकांना "ग्रास" या प्रणालीद्वारे ऑनलाईन चलन भरणे बंधनकारक करण्यात यावे. याकरिता सर्व जमा महसूल 100 टक्के ई-चलनाद्वारे भरण्याकरीता विभागीय उप आयुक्त स्तरावर अधीक्षकांच्या बैठका घेण्यात याव्यात. तसेच जिल्हा स्तरावर सर्व अनुज्ञप्तीधारकांच्या बैठका घेऊन जमा महसूल ई-चलनाद्वारे भरण्याबाबत अनुज्ञप्तीधारकांना सूचित करण्यात यावे.
2. शासन जमा लेखांकन प्रणाली (GRAS) च्या माध्यमातून ईलेक्ट्रॉनिक पध्दतीने शासन खाती जमा केलेल्या रकमांच्या लेखांकन व ताळमेळाबाबत संदर्भ क्र. 4 च्या पत्रान्वये संचालनालय, लेखा व कोषागारे यांनी शासकीय लेखा नियम पध्दतीच्या अनुषंगाने महालेखापाल कार्यालयाने खालीलप्रकारचे आक्षेप नोंदविलेले आहेत.

**अ)** ई-जमांसाठी ठेवलेल्या रोकड वही देखाभालीच्या कार्यपध्दतीचे अनुसरण न करणे.

**ब)** ई-जमांचे रोकड पुस्तिकेत लेखांकन.

**क)** ई-जमांचे चुकीचे वर्गीकरण.

**ड)** अदाकर्त्यास (अनुज्ञप्तीधारक) सेवा पुरविल्यानंतर ग्रास मधील ई-पावत्यांचे विरुपीकरण.

ई) परतावा प्रक्रिया अनुसरण न करणे.

फ) बनावट ई-पावत्या.

उपरोक्त आक्षेप/ त्रुटी राहू नयेत म्हणून खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत-:,

I. मुद्दा क्र. **अ व ब** बाबत संदर्भ क्र. 2 मधील शासन परिपत्रकामधील तरतूदींनुसार कार्यवाही करण्यात यावी.

II. मुद्दा क्र. **क** बाबत योग्य लेखाशिर्षाखाली शुल्क जमा होईल याची दक्षता घ्यावी.

III. मुद्दा क्र. **ड** बाबत अदाकर्त्यास सेवा पुरविल्यानंतर ई-चलने विरुपीत होतील याची दक्षता घेण्यात यावी. अदाकर्त्यास सेवा पुरविल्यानंतर ई-चलन विरुपित न केल्यास प्रभारी अधिकारी/ अधीक्षक यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

IV. मुद्दा क्र. **ई** बाबत परतावा प्रक्रिया शासन तरतूदी नुसारच करण्याची दक्षता घ्यावी.

V. मुद्दा क्र. **फ** बाबत बनावट ई-चलने प्राप्त झाल्यास तात्काळ वरिष्ठांना कळविण्यात यावे.

3. मुख्य लेखाशिर्ष 0039 "800 इतर जमा रकमा"या उद्दिष्टाखाली मोठ्या प्रमाणात महसूल जमा होत असल्यामुळे महालेखापाल कार्यालयाने याबाबत आक्षेप नोंदविलेले आहेत. या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, सदर लेखाशिर्षाखाली खालील बाबींचा समावेश होतो-:

1. जड संग्रह विक्री.
2. पर्यवेक्षण शुल्क.
3. परिक्षा फी.
4. इतर बाबी.

तरी मुख्य लेखाशिर्ष 0039 "800 इतर जमा रकमा" या शिर्षाखाली उपरोक्त नमूद बाबींनुसारच महसूल जमा करण्यात यावा. अन्य लेखाशीर्षाखालील रक्कम कुठल्याही परिस्थितीत 0039 "800 इतर जमा रकमा" या शिर्षाखाली जमा केली जाणार नाही यासाठी अधीक्षकांनी कार्यालयीन अधिकारी/कर्मचारी तसेच अदाकर्त्यांना लेखी स्वरुपात मार्गदर्शन करावे.

उपरोक्त सूचनांची तात्काळ काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

**स्थळ प्रतीवर मा. आयुक्तांची स्वाक्षरी आहे.**

(मा. सु. इंगोले.)
सह-संचालक (लेखा)
राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत-:

1. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य.
2. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य.
3. सर्व प्रभारी अधिकारी आसवनी घटक.
4. उपसंचालक, सांख्यिकी व संगणक. (सदरचे परिपत्रक वेब साईटवर अपलोड करण्यात यावे.)